# जगभरचे अलिकडचे नैसर्गिक [?] उत्पात

## पुरन्दरे चन्द्रशेखर

असे म्हटले जाते की नैसर्गिक उत्पात शंभर टक्के निखळ नैसर्गिक नसतोच. सगळ्या उत्पातांमागे मोठ्या प्रमाणावर मानवी दोष असतो. स्थलकालानुसार हे दोष बदलतात. उदा. अशा आपत्तीच्या पूर्वसूचनांकडे दुर्लक्ष, वर्षानुवर्षांची पर्यावरण हानी, भ्रष्टाचार, एखाद्या प्रकल्पाचे गैरनियोजन, इत्यादि. या लेखात लिबिया, मोरोक्को या देशांतील मोठी जीवितहानी करणाऱ्या अलीकडच्या घटनांचा आढावा घेतला आहे. त्यातील बरेच घटक आपल्याकडेही प्रस्तुत आहेत.

### डेरना, लिबिया

डेरना हे सुमारे एक ते दीड लाख लोकसंख्येचे गाव लिबिया देशाच्या उत्तरेला भूमध्य समुद्राला लागून आहे. वाडी डेरना नावाची नदी गावामधून जाते. या नदीवर दोन धरणे होती. २३ सप्टेंबरला आधी प्रचंड वादळ मग जोरदार पाऊस त्या प्रदेशात झाला. त्यामुळे दोन्ही धरणे फुटली व गाव पाण्याखाली गेले. किमान वीस हजार लोक बुडून मरण पावले असावेत, अनेक बेपत्ता आहेत. विशेष म्हणजे, अगदी आधल्या दिवसापर्यंत सरकार धरणे सुरक्षित आहेत, लोकांनी घाबरू नये असे विधान करत होते.

या अपघाताची पार्श्वभूमी पाहू. दोन्ही धरणे त्यावेळच्या युगोस्लाविया देशाच्या मदतीने '७३ ते '७७ च्या दरम्यान बांधण्यात आली. त्यावेळी कर्नल गदाफी या हुकूमशहाची राजवट होती. काही वर्षांनी धरणांच्या भिंतींना तडे जाऊ लागले. इंजिनीयर्सनी वारंवार हा धोका राजवटीच्या निदर्शनाला आणला. या सूचनांकडे दुर्लक्ष करण्यात आले. '९८ ला अखेर सरकारने आपली एक समिती नेमली. धरणे असुरक्षित होत आहेत असा निष्कर्ष समितीनेही काढला. दहा वर्षांनी सरकारने काहीतरी कृती सुरू केली. २००७ साली एका तुर्की कंपनीला धरणे दुरुस्त करण्याचे काम ३ कोटी डॉलर्सला देण्यात आले. कंपनीने लिबियाकडून ६० लाख डॉलर्सही घेतले. त्यातील हिस्सा अर्थातच लिबियन उच्च पदाधिकाऱ्यांकडे गेला.

पण सरकारने त्या कंपनीला आणखी मोबदला देण्यात दिरंगाई केल्याने काम सुरू व्हायला २०१० साल उजाडले. फेब्रुवारी २०११ पर्यन्त जेमतेम धरणाच्या आजूबाजूच्या जमिनीवर प्राथमिक काम झाले होते. धरणाच्या भिंतीत सिमेंट भरणे सुरूही झाले नव्हते. त्यानंतर काही महिन्यातच त्याच वर्षी अरब वसंतातील उठावामुळे गदाफी पदच्युत झाला व काम बंद पडले. गदाफीनंतर लिबियात अराजक आले, ते आजतागायत. दोन परस्परविरोधी सशस्त्र गटांनी देशाचे दोन भाग केले व आपापल्या अखत्यारीत घेतले. पूर्व लिबियात एका आधीच्या लष्करी अधिकाऱ्याची सत्ता आहे तर पश्चिम लिबियात दुसरे सरकार आहे. पश्चिमेतील सरकार जगाने अधिकृत म्हणून मान्य केले आहे. या दोन्ही सत्ताकेंद्रात सुरुवातीपासून हिंसक युद्ध चालू असते.

त्यामुळे अशा महत्त्वाच्या कामांकडे पूर्णतः दुर्लक्ष झाले. इतके, की, २०२१ च्या सरकारी ऑडिटनुसार या धरणांच्या दुरुस्तीसाठी मान्य झालेले २३ लाख डॉलर्स तसेच पडून राहिले होते.

डेरना पूर्व लिबियात आहे. तर आंतरराष्ट्रीय मदत अधिकृत सरकारला म्हणजे पश्चिमेकडे गेली. त्यातील किती पैसा पूरग्रस्त लोकांना द्यायचा या विवादात बहुतेक मदत अडकली आहे. ती राजकीय इच्छाशक्तीही नाही.

गदाफीच्या सरकारचा लिबियाच्या विकासासाठी एक विभाग होता. तो मोठी कंत्राटे कंपन्यांना देत असे. या विभागाचा प्रमुख अली डेबा नावाचा गृहस्थ. तो आपल्याला वैयक्तिकरीत्या कोणती कंपनी किती पैसा लाच म्हणून देईल यावर कंत्राट देणे ठरवत असे. धरण दुरुस्त करणारी तुर्की कंपनी त्यातील एक. या इसमाने विविध कंत्राटांत सुमारे ७ कोटी डॉलर्सची वैयक्तिक कमाई केल्याचा अंदाज आहे. हे पैसे विदेशात ऐषारामी मालमत्तेत, बँकांमध्ये गुंतवण्यात आले आहेत. त्याची चौकशी सुरू झाली पण बंदही पडली कारण त्याचा पुतण्या आताच्या पश्चिमेतील सरकारचा पंतप्रधान झाला. यावरून हा भ्रष्टाचार किती वरपर्यंत

पोचलेला आहे हे लक्षात यावे.

आधी हुकूमशाही, मग काही काळ इस्लामिक स्टेटचा त्या प्रदेशात हिंसक प्रवेश, नंतर दोन भ्रष्ट सरकारे असे सगळे घटक धरणे कोसळायला आणि शेकड्याने निरपराध बळी जाण्यामागे आहेत.

या घटनेनंतर लोक संतापाने रस्त्यावर आले. पूर्व आणि पश्चिम लिबियातील दोन्ही भ्रष्ट राजवटी गेल्या पाहिजेत अशी त्यांची मागणी आहे.

## मोरोक्को

लिबियामध्ये भ्रष्टाचार हे आपत्तीचे प्रमुख कारण होते तर मोरोक्कोमध्ये व्यवस्थात्मक त्रुटी, त्यातही सरकारचे अर्थकारण हे प्रमुख कारण आहे. मोरोक्को देश उत्तर आफ्रिकेत येतो. तेथे लोकशाही नाही. पारंपारिक राजेशाही आहे. राजावर टीका हा दखलपत्र गुन्हा आहे.

प्रथम भूकंपाचा आढावा घेऊ. ८ सप्टेंबरला मोरोक्कोच्या पश्चिम भागात मोठा भूकंप झाला. हा गेल्या शतकातील सगळ्यात अधिक तीव्रतेचा होता. हा भाग डोंगराळ आहे. तेथे छोटी खेडी आहेत. भूकंपात कमीत कमी तीन हजार (काही अंदाजाने पाच हजार) लोक मरण पावले व काही हजार जखमी झाले. अनेक बेपत्ता आहेत. मदतकार्य सुरू केले ते आधी स्थानिकांनी, नंतर सगळ्या देशातून मदतीचा ओघ सुरू झाला पण सरकार निष्क्रिय राहिले. या भागाकडे एक महत्त्वाचा रस्ता डोंगरातून जातो. मदत घेऊन जाणाऱ्या अवजड वाहनांमुळे तेथे ट्रॅफिक जॅम झाला. अशा वेळी, किंबहुना, अशी वेळ येऊच नये यासाठी सरकार सतर्क असले पाहिजे, मदतीच्या ओघाचे नियोजन व्हायला हवे. अर्थात जेथे सरकार मदतही करत नाही, तेथे ही अपेक्षा करणे चूक आहे. लोकांना निवारा देण्याचे प्राथमिक कामही सरकारने केले नाही. मोरोक्कोच्या सामान्य नागरिकांनी स्वयंसेवेने दोन दोन दिवस ड्रायविंग करून मदत आणली. पाणी, अन्नपदार्थ, तंबू, गाद्या, वगैरे. मोठया ट्रकांपेक्षा छोट्या गाड्या अधिक सुलभतेने त्या रस्त्यांवरून जाऊ शकत असत. वर्षानुवर्षांच्या दुर्लक्षामुळे अनेक रस्ते इतके खराब होते की दुर्गम खेड्यांपर्यंत पोचणे मुश्किल.

राजा बराच काळ पॅरिसमध्ये असतो. त्याचे निकटवर्तीय त्याचे शाळेतले दोस्त आहेत. तो कधीच मीडियाशी बोलत नाही किंवा सार्वजनिक कार्यक्रमात दिसत नाही. व्यवस्थेत राजकीय विरोधकांना वाव नाही.

तरीही लोकांना त्याच्याबद्दल आदर आहे. थायलंडच्या राजावर जशी सार्वजनिक टीका होत नाही, तसेच या राजाबाबत. लोकांचा रोख खाजगीत त्यामुळे त्याच्या सल्लागारांकडे वळतो.

मोरोक्कोची सामाजिक परिस्थिती पहाता, गरीब–श्रीमंत ही तफावत प्रचंड आहे आणि वाढत आहे. भूकंपामुळे ही तफावत पुढ्यात आली आहे. राजधानी, मोठी शहरे येथील चकचकीत मोठे रास्ते, उंच आधुनिक इमारती यांच्या तुलनेत ग्रामीण भाग अजून मागच्या शतकात राहिलेला आहे. याचे कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय भांडवल आकर्षित करण्यासाठी सरकार तशा दिखाव्यावर व सुविधांवर शहरी भागात खर्च करते, ग्रामीण भागात नाही. (आपल्याकडच्या बुलेट ट्रेन्स) विकासाच्या त्या प्रारूपाचा भाग म्हणून सरकारी सार्वजनिक सेवांच्या खाजगीकरणावर भर आहे. स्वयंसेवेने लोक आता आपल्या वस्त्या दुरुस्त करत आहेत, त्याला वरवर मदत सरकार करेल व पुनर्वसनाचे श्रेय घेईल, हाही त्या प्रारूपाचा आविष्कार आहे. आपल्याकडे, मुंबईत लोक जमीन रहाण्यासारखी करतात आणि झोपडपट्ट्या उभारतात, नंतर बिल्डर त्यांना हुसकावून त्यांनी दुरुस्त केलेल्या जमिनीवर इमले उभारतो. तोच प्रकार.

सरकारी धोरणानुसार लोकसेवा देणाऱ्या सरकारी खात्यांच्या बजेटमध्ये कपात होत आहे. त्यामुळे रस्ते संभाळणाऱ्या, भूकंपाची पूर्वसूचना देणाऱ्या संस्था नीट काम करू शकत नाहीत. जागतिकीकरणाखाली जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या शिफारसी प्रमाण मानून सरकार अर्थकारण करते. या संस्थांना गरीबांच्या कल्याणापेक्षा बहुराष्ट्रीय कंपन्यांना अधिक उद्योग मिळणे महत्त्वाचे असते. हा प्रकार जेथे या संस्थांचा निर्णयक्षम शिरकाव होतो, तेथे जगभर आढळतो. तोच मोरोक्कोमध्ये.

## विकसित देशातील उत्पात

या तुलनेत विकसित देश अशा उत्पातांना कसे सामोरे जातात ते पहाण्यासारखे आहे. जपान, अमेरिकेत अशा आपत्तीची पूर्वसूचना मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक करण्यात येते. त्यासाठी

**(पान ३२ वर)**

**(जगभर : पान २९ वरुन)**
टीव्ही , मोबाइल फोन यांच्यावर सतत प्रसारण करण्यात येते. लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात येते. जपानमध्ये त्यामुळे मोठ्या भूकंपानंतरही हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच लोक दगावतात. आपत्तीमध्ये सापडल्यास काय करावे याचा सविस्तर सल्ला आधीच लोकांपर्यंत पोचवण्यात येतो. आपत्तीनंतर लगेच जे लोक बेपत्ता झाले आहेत, त्यांची नावे प्रसिद्ध करण्यात येतात. अमेरिकेतील हवाईमध्ये ऑगस्टमध्ये वणवे पेटले व जीवितहानी झाली. अशा वेळी बेपत्ता लोक ही नातलगांसाठी तीव्र व्यथा होते. कमावणाऱ्या माणसाचे बेपत्ता होणे हा कुटुंबावर मोठा घाला असतोच, त्यात त्या माणसाचा मृत्युदाखला वगैरे औपचारिक कामकाजही होऊ शकत नाही. मग त्यांच्या वेदनेत भर पडते. त्यावेळी त्या सरकारने दक्षतेने मदत केली. लिबिया व मोरोक्कोत हे घडले नाही. गरीब देशांना हे नियोजन खर्चाच्या दृष्टीने परवडण्यासारखे नसते. अशावेळी विकसित देशांनी, आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संघटनांनी योग्य ती मदत तेव्हा करणे जरुरीचे असते.

purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk